२४९४०/१०

परवानगी वर्ष :- २००९-२०१०
माध्यम :- इंग्रजी
कायम विना अनुदान

जा.क्र.शिउसं/ माध्य-३/१२/प्र.मा./पुवि/२०१०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक :- 16 NOV 2010

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद,पुणे.

विषय :- प्रथम मान्यताबाबत..(जून-२००९ पासून इयत्ता ८वी च्या वर्गास)
मंगेश मेमोरियल इंटरनॅशनल स्कूल,बालाजीनगर,दौंड ता.दौंड
जिल्हा पुणे.

संदर्भ- १) आपले पत्र क्रमांक शिक्षण/माध्य-/नमाशा/प्रमा/१४७८/१०दि.१६.०७.२०१०
२) संबंधित संस्थेचे पत्र दिनांक २९.०९.२०१०
२) शासन पत्र क्रमांक नमाशा-२००९/(७१७/२००९)/मशि-१
दिनांक २४.०८.२००९
३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक माध्य-३/१२/नमाशा/मान्यता/पुवि/२०१०
९८८५/८८ दिनांक २७.०४.२०१०

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की,माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१ , ३.२ , व ३.३ अन्वये **श्री.मंगेश मेमोरियल एज्युकेशन सोसायटी,कोरेगाव पार्क,पुणे.** या संस्थेच्या **मंगेश मेमोरियल इंटरनॅशनल स्कूल,बालाजीनगर,दौंड ता.दौंड जिल्हा पुणे.** या माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवीच्या वर्गास सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षासाठी जून-२००९ पासून एक वर्षासाठी कायम विना अनुदान तत्वावर आपली स्पष्ट शिफारस विचारात घेता प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) जिल्हा परिषद यांनी संबंधित शाळा खालील अटींची पूर्तता करीत आहे किंवा कसे १ याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्यावेळी खालील अटी संस्थेने/शाळेने पूर्ण केल्या आहेत किंवा कसे १ याबाबतचा अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा. पुढील कालावधीसाठी प्रथम मान्यतेचा प्रस्ताव पाठविण्याची संबंधित शाळेची जबाबदारी राहील.

१) संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२) मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तिची नेमणूक करावी.
३) स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४) स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दर वर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५) विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६) पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७) स्वतंत्र स्वच्छतागृहाची (मुलां-मुलींसाठी)सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८) वाढीव फी चे दर मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कडून मंजूर करुन घ्यावेत.
९) शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेऊन त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०)कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११)शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२)विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३)तपासणी अहवालातील सूचनांची पुर्तता करावी.
१४)पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.

(मागे पहा..)

Rhosale
**HEADMISTRESS**
**SHREEMANGESH MEMORIAL INTERNATIONAL**
**SCHOOL-DAUND**

१५) विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६) विद्यार्थी संख्या वाढवावी.

४) जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१) शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.
२) शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.
३) शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४) सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी.व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.
५) प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे.वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ :-१) शासन पत्र क्रमांक याचिका-२००९/प्र.क्र.२४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर २००९.
२) संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२००९/६४११६/याचिका/१५ क(८)१३४४ दिनांक २४ सप्टेंबर-२००९.

टीप :- जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.४.०९ रोजी दिलेल्या आदेशानुसार संबंधित संस्थेने/शाळेने विहित मुदतीत पूर्तता न केल्यास सदरचे आदेश आपोआप रद्द होतील याची नोंद घ्यावी.

स्थळ प्रतीवर मा.शि.उ.सं.यांची स्वाक्षरी असे.

( बाळासाहेब ओव्हाळ )
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-०१.करिता.

प्रत माहितीस्तव व तात्काळ कार्यवाहीसाठी,
१) मुख्याध्यापक, मंगेश मेमोरियल इंटरनॅशनल स्कूल,बालाजीनगर,दौंड ता.दौंड जिल्हा पुणे.
२) अध्यक्ष/सचिव श्री.मंगेश मेमोरियल एज्युकेशन सोसायटी,कोरेगाव पार्क,पुणे.
३) निवडनस्ती.